सं.फौ.ख.क्र.१६८/२०१७
शोभा वि. लिलाबाई

**नि.क्र.१ वरील आदेश**

प्रस्तुतचा खटला फिर्यादी यांनी आरोपी यांच्याविरुद्ध भा.द.वि.कलम ४९९, ५००, ५०१ नुसार दाखल केला होता. सदर खटला या न्यायालयाने दि.०१.०८.२०२४ रोजी फौ.प्र.सं. कलम २५६ नुसार काढुन टाकला होता. सदर आदेशाविरुद्ध फिर्यादी यांनी मा. उच्च न्यायालय यांच्याकडे क्रि.अपिल क्र.३८/२०१६ दाखल केला होता. त्यावर मा. उच्च न्यायालय यांनी दि.१६.०२.२०२६ रोजी आदेश पारीत केला. त्यामध्ये या न्यायालयाने दि.०१.०८.२०२४ रोजी पारीत केलेला आदेश हा रद्द बातल करुन या न्यायालयाला सदर खटला पुन्हा नव्याने चालवुन कायदेशीररित्या निकाली काढण्याचे आदेश पारीत केले आहे. त्याबाबतची मा. उच्च न्यायालय यांची रिट या न्यायालयात आज रोजी प्राप्त झाली आहे. त्याकरीता सदर खटला हा पुन्हा बोर्डावर घेणे आवश्यक आहे. करीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.** सं.फौ.ख.क्र.१६८/२०१७ हा पुन्हा फैलावर घेण्यात येतो.

**२.** फिर्यादी व आरोपी यांना त्याबाबत समन्स काढण्यात यावे.

स्वा/-

दि.२६.०२.२०२६

**(श्री. जी.एन. लंघे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
बदनापूर.